**नि.फौ.के. नं. ५८/२०२३**
**महाराष्ट्र शासन वि. दिपक गोंधळी व इतर**
**निशाण क्र. २२**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु</u>**

**नाव** – सायली समीर वनकर,
**वय –** २९ वर्षे, **व्यवसाय** – खाजगी नोकरी,
**राहणार** – देवरुख, कांजीवरा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून–</u>**

**०१**. दिनांक १४/०६/२०२३ रोजी पोलीसांनी मला बी.एस.एन.एल. ऑफीस देवरुख येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. मला तेथे घटनास्थळ पोलीसांनी दाखविले. ते ठिकाण म्हणजे बी.एस.एन.एल. चे ऑफीस आहे. त्या कार्यालयाच्या आजूबाजूला त्या कार्यालयाचीच चिरेबंदी कम्पाउंड आहे. ते कार्यालय दक्षिणमुखी आहे. तेथे पूर्वेस त्या कार्यालयाच्या कम्पाउंड पलीकडे एचपी गॅस ची एजेन्सी आहे. त्या कार्यालयाच्या पश्चिमेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन आहे. त्या कार्यालयाच्या दक्षिणेस पित्रे हॉलची इमारत आहे. त्या कार्यालयाच्या उत्तरेस आठल्ये सप्रे महाविद्यालय ते शिवाजी चौक जाणारा डांबरी रस्ता आहे. पोलीसांनी तेथे पंचनामा केला. मी त्या पंचनाम्यावर सही केली. पंचनाम्यावेळी दत्तात्रय शिंदे म्हणून अजून एक पंच होते. तसेच तेथे मृणाल वाडेकर या बी.एस.एन.एल. च्या अधिकारी उपस्थीत होत्या. मला आता दाखविण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर अनुक्रमांक ०२ ची पंच म्हणून माझी सही आहे. त्या पंचनाम्यातील मजकूर बरोबर आहे (सदर पंचनाम्यास **<u>निशाणी २३</u>** देण्यात आली).

**०२**. तेथे पोलीसांनी घटनास्थळाचा नकाशा काढला होता. मला आता दाखविण्यात आलेला घटनास्थळ नकाशा तोच आहे. त्यावर अनुक्रमांक ०२ ची पंच म्हणून माझी सही आहे. त्या नकाशातील मजकूर बरोबर आहे (सदर पंचनाम्यास **<u>निशाणी २४</u>** देण्यात आली).

**<u>सरतपास पुर्ण</u>.**

**<u>उलटतपास – आरोपींतर्फे विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण यांच्याकडून</u> –**

**०३**. हे म्हणणे खरे नाही की, २०२३ साली मी बी.एस.एन.एल. ऑफीसमध्ये कार्यरत होते. मी केशव सृष्टी, देवरुख येथे अकाउंटन्टं म्हणून काम करते. दिनांक १४/०६/२०२३ रोजी सुध्दा मी तेच काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, देवरुख येथील बी.एस.एन.एल. कार्यालय हे भर वस्तीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिवाजी चौक ते आठल्ये सप्रे महाविद्यालय या डांबरी रस्त्याच्या एका बाजूला बी.एस.एन.एल. च्या कार्यालयाची इमारत व दुसऱ्या बाजूस त्या कार्यालयाची मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती मोकळी जागा वापरात नसल्यामुळे तो पूर्ण जंगलमय भाग झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या कार्यालयाच्या तटबंदीला तारेचे कुंपन नाही.

**०४**. हे म्हणणे खरे नाही की, आज साक्ष देण्यापूर्वी मी पंचनामा वाचला आहे. घटनास्थळ नकाशा (निशाणी २४) कोणी काढला त्या व्यक्तीचे नाव मला सांगता येत नाही. पंचनाम्यात नमूद गुन्हा नोंद क्रमांक व कायद्याची कलमे मला सांगता येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर मी फक्त सही केली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटाच आहे.

**<u>उलटतपास पूर्ण</u>**.

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.09.27 18:28:18 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक २७.०९.२०२४ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date of decision | :- | 27/09/2024 |
| Evidence signed by PO. on | :- | 27/09/2024 |
| Evidence uploaded on | :- | 27/09/2024 |